जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८७ दिनांक - ०१/०२/२०२४**

# १०३ एम.पी.डी.ए. व ११७ मकोका कारवाई

लोणीकंद पोलीस स्टेशन,पुणे शहर

## ईस्माईल मैनुद्दीन शेरेकर (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०३ साथीदार यांचे विरुध्द मकोका कारवाई

दि.२१/११/२०२३ रोजी यातील फिर्यादी यांचा मुलगा हा त्याचे मित्रांसह वाघोली लोहगांव रोडवरील हॉटेल २४ क्लब हाऊसचे बाहेर बोलत उभा असताना,यातील येरवडा पोलीस स्टेशनच्या रेकॉर्ड वरील सराईत गुन्हेगार नामे ईस्माईल शेरीकर, कुणाल जाधव ऊर्फ राजा, राहुल घाडगे ऊर्फ आर.डी.जी. व सुदेश गायकवाड यांनी फिर्यादीचे मुला जवळ येवुन,तु अंश पुंडे याचेबरोबर का राहतो,तुंला खुप माज आला काय,तु खुप मोठा भाई झाला का असे बोलुन,अंश पुंडे याचेबरोबर असलेल्या जुन्या वादाचे कारणावरून चिडुन जावुन,त्यास शिवीगाळ व दमदाटी करून,लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून,फिर्यादी यांचे मुलास गंभीर दुखापत केल्याने फिर्यादी यांचे तक्रारीवरुन **लोणीकंद पोलीस स्टेशन गु.रजि.नं.९३३/२०२३,भादंवि कलम ३२५,३२३,५०४,५०६,३४** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान पाहिजे आरोपी नामे **१)ईस्माईल मैनुद्दीन शेरेकर,रा.लक्ष्मीनगर पोलीस चौकी समोर येरवडा,पुणे (टोळी प्रमुख) २)कुणाल ऊर्फ राजा किसन जाधव,रा.चौधरी वस्ती,खराडी बायपास,पुणे ३) सुदेश ऊर्फ बाब्या रुपेश गायकवाड, रा. बाराते वस्ती,सुभाषनगर येरवडा,पुणे ४)राहुल घाडगे ऊर्फ आर.डी.जी.रा.येरवडा,पुणे (टोळी सदस्य) यांनी केल्याचे निष्पन्न झाले असुन ते सराईत गुन्हेगार असुन,आ.क्र.१ ते ४ हे पाहिजे आरोपीत आहेत.**

सदर नमुद पाहिजे आरोपी **ईस्माईल मैनुद्दीन शेरेकर (टोळी प्रमुख)** याने त्याचेसह अन्य सदस्यां साठी आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नविन साथीदार यांना सोबत घेवुन स्वतःची संघटीत टोळी तयार करुन गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलेले असुन,त्यांचेवर येरवडा पोलीस स्टेशन व विमानतळ पोलीस स्टेशन येथे खुन, खुनाचा प्रयत्न, जबर दुखापत करुन दरोडा, गंभीर दुखापत, चोरी, बेकायदेशीर जमाव जमवीने, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे असे गुन्हे दाखल आहेत. त्यांनी टोळीचे वर्चस्व निर्माण करण्याचे हेतुने व इतर फायदयासाठी बेकायदेशीर मार्गाने गैरवाजवी आर्थिक फायदा व इतर फायदा मिळविण्याच्या उद्देशाने तसेच हिंसक मार्गाचा

अवलंब करुन,जनमाणसात दहशत पसरविणे या सारखे गंभिर स्वरुपाचे गुन्हे वारंवार केलेले आहेत. त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करुन सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटितपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे व टोळीचे वर्चस्व निर्माण करण्याचे हेतुने व इतर फायदयासाठी सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आलेने तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) या कलमांचा अंतर्भाव करणेकामी लोणीकंद पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विश्वजीत काइंगडे यांनी मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ४,पुणे,श्री.विजय मगर यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन लोणीकंद पोलीस स्टेशन पुणे शहर गु.रजि.नं.९३३/२०२३, भा.दं.वि. कलम ३२५,३२३,५०४,५०६,३४ या दाखल गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१) (ii),३(२),३(४) प्रमाणेचा अंर्तभाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे, श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर,श्री.संजय पाटील हे करीत आहे.

सदरची उल्लेखनिय कामगीरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, (अति.कार्यभार),मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे,श्री.रामनाथ पोकळे, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०४,पुणे,श्री.विजय मगर यांचे मार्गदर्शना खाली लोणीकंद पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विश्वजीत काइंगडे, पोलीस निरीक्षक,गुन्हे,श्री. मारुती पाटील, सीमा ढाकणे, सहा.पोलीस निरीक्षक,रविंद्र गोडसे, पोलीस उप-निरीक्षक,राहुल कोळपे, रामकृष्ण दळवी व सर्व्हेलन्स पथकातील पोलीस अंमलदार, प्रशांत कापुरे, सागर कडु, शुभम सातव यांनी केली आहे.

**मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्यानंतर १६ डिसेंबर २०२२ ते ३१ जानेवारी २०२४ रोजीपर्यंतचे कार्यकाळात १०३ दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई करण्यात आली. तसेच ११७ संघटीतपणे गुन्हेगारी टोळयांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे.**